# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
## छत्रपती संभाजीनगर

परीक्षा व मूल्यमापन विभाग

## तात्काळ परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक व प्राध्यापक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम-८९ मधील तरतुदीनुसार सर्व परीक्षांचे निकाल परीक्षा संपल्याच्या शेवटच्या दिनांकानंतर ३० दिवसांच्या आत लावणे बंधनकारक आहे. मागील पाच वर्षाचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात आले की, आपल्या विद्यापीठाचे बरेच निकाल हे ४५ दिवसानंतर घोषित झालेले आहेत. या कारणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच मा. कुलपती तथा राज्यपाल महोदयांच्या कार्यालयातुन याबाबत वारंवार खुलासा सादर करण्या संदर्भात विचारणा केली जाते.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ च्या पदवी व इतर अभ्यासक्रमांच्या परीक्षा संपलेल्या असून छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व धाराशिव जिल्हा निहाय क्षेत्रिय मुल्यांकन केंद्र निश्चित करण्यात आलेले असुन उत्तरपत्रिका मुल्यांकनाचे कार्य सुरु आहे. **सदर क्षेत्रिय मुल्यांकन केंद्रावर बी.एस्सी. अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका मुल्यांकनासाठी अत्यंत अल्प प्रतिसाद मिळत असल्यामुळे सर्व संबधित महाविद्यालय/परिसंस्थेतील अध्यापकांना संबधित विषयांच्या उत्तरपत्रिका मुल्यांकनसाठी दि. २८.०१.२०२५ ते ०२.०२.२०२५ रोजी दरम्यान शिवकणी बंद करुन पुर्णवेळ कार्यमुक्त करण्यात यावे.**

त्यानुसार सर्व परीक्षांचे निकाल ३० दिवसाच्या आत कसे लागतील यासंबधी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठामार्फत सुध्दा प्रत्येक दिवशी सर्व मूल्यमापन केंद्रांचा आढावा घेण्यात येणार असून; मूल्यमापन मुल्यांकन केंद्र प्रमुखांनी सुध्दा सर्व संबधितांनांची वेळोवेळी बैठक घेऊन त्यांना या संदर्भात माहिती देऊन मार्गदर्शन करावे व सदर निकाल हे कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसाच्या आत लागतील यासाठी काटेकोरपणे प्रयत्न करावेत.

**सबब, बी.एस्सी. अभ्यासक्रमांच्या सर्व संबधित विषयांच्या प्राध्यापकांनी उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन क्षेत्रिय मूल्यमापन केंद्रांवर जावून उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी सहभाग नोंदवणे आवश्यक आहे. अन्यथा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४८(४) मधील तरतुदी प्रमाणे परीक्षेच्या कामात कसूर केल्याप्रकरणी संबधितांवर कार्यवाही करण्यात येईल. याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी.**

करिता, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी. ही विनंती.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर | : | **प्रा. डॉ. भारती गवळी** |
| संदर्भ क्र. : परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२५/८९२ | : | संचालक, |
| दिनांक : २७.०१.२०२५ | : | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |